## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३०/२०२२/नंदुरबार**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. अशोक मदन प्रकाशकर,<br>रा. १८, पटेलवाडी, कोरीट रोड,<br>नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. | कार्यालय अधीक्षक,<br>उपवनसंरक्षक मेसावी वनविभाग, तळोदा यांचे कार्यालय,शहादा रोड,तळोदा,ता.तळोदा,जि.अहमदनगर |

**सुनावणी दिनांक २१/०२/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ०२/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २१/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित व संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०२/०१/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, दि. १६/०३/२०२० रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात कळविलेले माहिती शुल्क दि. १५/०६/२०२० रोजी भरना केले. मात्र माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपिलासंदर्भात आजपावेतो कुठलीही सुनावणी घेण्याबाबत त्यांनी मला कळविलेले नाही व त्यांच्या कार्यालयातुन प्रथम सुनावणीबाबत कुठलेही आदेश जारी झालेले नाहीत. दि.१६/०३/२०२० रोजीच्या अर्जान्वये दि. ३१/१०/२०१६ कालावधीतील प्रोटो निम केक खरेदी व इतर कुटाढ साहित्याची खरेदी प्रमाणके व त्याचे संपूर्ण रेकॉर्ड अटेस्टेड प्रतीत मग्रारोहयो सहीत पुरवावे.

३) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांच्या दि. १६/०३/२०२० च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिल निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. १३/०९/२०२२ अन्वये एकुण १०६ पानांची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तसेच माहिती पोस्टाने पाहिजे असे माहिती अर्जामध्ये नमूद होते, परंतु पोस्टाचे पैसे भरले नाही, केवळ माहितीचे शुल्क भरले ते पण अपुर्ण पैसे भरले आहे. तसेच प्रथम अपिल अर्ज दि. १९/०६/२०२१ रोजीचा सादर केल्याचा पुरावा जोडलेला नाही. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ३०/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र आ-३७९९ 15 OCT 2024